# मेट्रो 3 प्रकल्पातील ५ किमी भुयारीकरण पूर्ण

**मुंबई** :कुलाबा वांद्रे सिप्झ मुंबई मेट्रो ३ प्रकल्पातील ५१०० मीटर लांबीच्या भूयारी करणाचे काम पूर्ण झाल्याची माहिती मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने दिली आहे. संपूर्ण भुयारी मेट्रो प्रकल्पाची अंमलबजावणी एमएमआरसीएलकडून करण्यात येत असून विविध ठिकाणच्या टीबीएम लॉन्चिग शाप्टद्वारे टनेल बोरिंग मशीन्स भूगर्भात दाखल करण्यात आल्या आहेत. मेट्रो प्रकल्पासाठी १७ टीबीएम्सची आवश्यकता असून त्या सर्वांची कारखाना स्वीकृती चाचणी यशस्वीरित्या पूर्ण झाली आहे. त्यापैकी १५ मशीन्स मुंबईत दाखल झाल्या असून ८ मशीन्स पूर्णतः कार्यान्वित झाल्या आहेत. उर्वरित ३ मशीन्स भूगर्भात सोडण्याचे काम सध्या सूरू आहे तर २ टीबीएम्स जुलै महिन्याअखेरीस जमिनीत सोडण्यात येतील. तर उर्वरित टीबीएम्स सप्टेंबरपर्यंत शाप्टमध्ये उतरविण्यात येतील.

सर्व १७ टीबीएम्स ऑक्टोबर २०१८ अखेरीस पूर्णतः कार्यान्वित होणे अपेक्षित आहे. सध्या आझाद मैदानातील वैतरणा १ व २ या टीबीएम्सने १०५० मीटरचे भूयारीकरण पूर्ण केले आहे. त्यांना ग्रँट रोड पर्यंत ४.५ किमीचे भूयार तयार करायचे आहे. तर नयानगर येथील कृष्णा १ व २ या टीबीएम्स २१६४ मीटर चे भूयारीकरण पूर्ण केले आहे. त्यांना दादर मेट्रो स्टेशनपर्यंत २.५ किमी भूयारी तयार करायचे आहे. विदयानगरी येथे गोदावरी १ व २ टीबीएम्स १०७३मीटर चे भूयारीकरण पूर्ण केले आहे. त्यांना सीएसआयए आंतरदेशीय विमानतळ स्टेशन पर्यंत २.९८ किमी भूयार तयार करायचे आहे, तर मरोळ नाका येथे वैनगंगा १ व २ या टीबीएम्सनी ८९६ मीटरचे भूयारीकरण पूर्ण केले आहे. त्यांना सीएसआयए आंतरराष्टीय विमानतळ स्टेशनपर्यंत १.२ किमी भूयर तयार करायचे आहे. याबाबत एमएमआरसीएलच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी सांगितले की, भूयारीकरणाचे काम सूरू झाल्यापासून १ वर्षाच्या आतच ५ किमी लांबीच्या भूयाराचे काम पूर्ण झाल्याचे सांगताना आनंद होत असून सर्वांच्या सहकार्याने आणि पाठिंब्याने हे शक्य झाले आहे. मेट्रो ३ प्रकल्पात अप आणि डाऊन असे दोन्ही भूयारी मार्ग विचारात घेता एकूण ५२ किमीचे भूयारीकरण अपेक्षित आहे. सध्या ८ टीबीएम्स आठवडयाला३५० या गतीने भूयारे खणत आहे. हा वेगा ऑक्टोबर २०१८ पासून प्रति आठवडा ७०० ते ८०० मीटर जाण्याची शक्यता आहे. पॅकेज ७ मधील टीबीएम सर्वप्रथम भूयार पूर्ण करून सप्टेंबर २०१८ मध्ये ब्रेकथ्रू साध्य करणे अपेक्षित आहे.